२१३८


महाराष्ट्र शासन
प्रवेश नियामक प्राधिकरण

९वा मजला, न्यु. एक्सेलसियर बिल्डींग,
ए.के. नायक मार्ग, फोर्ट,
मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२ - २२०७ ३७१९ / २८
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : ara@maha-ara.org


क्रमांक : बैठक-१८२४/प्र.क्र. ३३८/प्रनिप्रा/३१ जुलै/२०२४/ 5699 दिनांक : 16/8/24

## बैठकीचे इतिवृत्त

**मा. श्री. जे.पी. डांगे (भा.प्र.से.), माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण** यांच्या अध्यक्षतेखाली बुधवार, दिनांक ३१ जुलै, २०२४ रोजी दुपारी १२:०० वा. झालेल्या प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या क्रमांक **८९व्या** बैठकीचे इतिवृत्त,-

सदरील बैठकीस प्राधिकरणाचे सदस्य १) डॉ. मुरलीधर गोंविदराव चांदेकर, ख्यातनाम शिक्षणतज्ञ, २) डॉ. एन.एस. उमराणी, व्यावसायिक शिक्षण क्षेत्रातील ख्यातनाम तज्ज्ञ, ३) डॉ. राजेंद्र शिवाजी बगाळ, कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक (दूरदृष्यप्रणालीद्वारे), ४) डॉ. वि.म. मोहितकर, संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई, ५) श्री. रावसाहेब भागडे, (भा.प्र.से.), सदस्य सचिव तथा महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे (दूरदृष्यप्रणालीद्वारे) व ६) श्री. दिलीप सरदेसाई (भा.प्र.से.), सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य हे बैठकीस उपस्थित होते.

तसेच प्राधिकरणाचे १) डॉ. शैलेंद्र देवळाणकर, संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा. यांनी बैठकीच्या अनुपस्थितीबाबत नियमाप्रमाणे रजेचा अर्ज दिलेला नाही त्यानुसार त्यांना अनुपस्थित घोषित करण्यात आले.

तसेच श्री. हरिविजय शिंदे, सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे प्रतिनिधी हे संबंधित संचालकांच्या वतीने विशेष निमंत्रित म्हणुन प्राधिकरणाच्या बैठकीस उपस्थित होते.

प्राधिकरणाच्या उक्त बैठकीचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे आहे,-

**विषय क्रमांक १ : माहे एप्रिल २०२४ ते जुन २०२४ या त्रैमासिक कालावधीतील प्राधिकरणाचे (सीईटी कक्षासह) आर्थिक लेखे प्राधिकरणाच्या अवलोकनार्थ व मान्यतेकरिता सादर करणे.**

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम १७, १८, १९ मधील तरतुदींच्या अनुषंगाने प्रवेश नियामक प्राधिकरणाचे (राज्य सामाईक प्रवेश कक्षासह) माहे एप्रिल २०२४ ते जुन २०२४ या त्रैमासिक कालावधीतील एकत्रित लेखे सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांनी प्राधिकरणास सादर केले. या संदर्भात सांगोपांग चर्चा करण्यात आली. सदरचे लेखे काही किरकोळ दुरुस्तीसह फेर सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

<u>विषय क्रमांक २:</u> <u>Perusal and approval of the investment of funds of ARA and CET Cell - with details of Fixed Deposit/Savings A/Cs. and Current A/Cs. etc with various banks, locking period, dates of maturity and interests accured, etc.</u>

सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांनी विषयांकित प्रकरणी प्राधिकरणास बँकांमध्ये असलेल्या मुदत ठेवी/बचत खाते व चालु खात्यावर असणा-या रकमेबाबत सविस्तर माहिती सादर केली. सदर माहितीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम १६ (४) च्या तरतुदीनुसार जास्तीत जास्त व्याज देणाऱ्या राष्ट्रीयीकृत बँकेत उपलब्ध निधी गुंतवण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

<u>विषय क्रमांक ३ :</u> <u>प्राधिकरण कार्यालयामध्ये बाह्ययंत्रणेद्वारे निव्वळ कंत्राटी तत्वावर भरती करण्यात आलेल्या ०३ कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती प्रस्तावास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्याबाबत.</u>

प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २८/०२/२०२३ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक ३(ग) मधील निर्देशानुसार प्रवेश नियामक प्राधिकरण कार्यालयामध्ये बाह्यस्त्रोता मार्फत निव्वळ कंत्राटी तत्वावर कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती संदर्भात सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांनी सविस्तर माहिती खालीप्रमाणे प्राधिकरणास सादर केली.

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) मधील कलम ९ नुसार प्रवेश नियामक प्राधिकरणास त्यांची कार्ये व जबाबदारी पार पाडण्यासाठी आवश्यक असणारे अधिकारी व कर्मचारी वृंदाची पदनिर्मिती करण्यास उच्चस्तर समितीच्या मान्यतेने उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या संदर्भ क्र. ५ वरील दिनांक ४/०८/२०१५ च्या शासन निर्णयान्वये पदांचा आकृतिबंध निश्चित करुन एकुण २२ पदांना मान्यता दिली आहे.

सदरील शासन निर्णयामधील परिच्छेद क्र. ३ अनुसार उपरोक्त मंजुर पदांमधील गट - क व गट - ड संवर्गातील पदे ही कंत्राटी पध्दतीने प्राधिकरणाच्या स्तरावर भरण्याची तरतूद असून गट - अ व गट - ब संवर्गातील पदे ही समकक्ष वेतनश्रेणीतील अन्य संवर्गामध्ये कार्यरत अधिकाऱ्यामधून प्रतिनियुक्तीने भरण्यात यावीत, असे निर्दशित केले आहे. तसेच परिच्छेद क्रमांक ४ अनुसार मंजुर आकृतिबंधाशिवाय गरजेनुरुप तांत्रिक/अतांत्रिक अतिरिक्त मनुष्यबळाची आवश्यकता भासल्यास कंत्राटी स्वरुपात नियुक्ती करु शकतील अशी तरतूद आहे. त्याअनुषंगाने प्राधिकरणातील कार्यालयीन कामकाजात वाढलेल्या व्यापाचा वेळीच निपटारा होणे आवश्यक आहे.

या संदर्भात सामान्य प्रशासन (माहिती व तंत्रज्ञान) विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या दिनांक २७/०९/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये माहिती तंत्रज्ञान / माहिती तंत्रज्ञान सहाय्यीत सेवांकरिता मनुष्यबळ महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळामार्फतच घेणे अनिवार्य राहिल, अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

मा. प्रवेश नियमाक प्राधिकरणाच्या दिनांक २८/०२/२०२३ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक २(ग) मध्ये खालील प्रमाणे निर्देश देण्यात आलेले आहेत,-

"................कार्यालयातील कामाची गरज लक्षात घेता मंजुर पदांपैकी सध्या कार्यरत असलेल्या पदे/कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त इतर रिक्त असलेल्या पदांवर भरती करण्याची आवश्यकता भासल्यास बाह्यस्रोता मार्फत नियमाप्रमाणे नियुक्ती करण्यात यावी."

प्राधिकरणाच्या उक्त निर्देशानुसार सद्यस्थितीमध्ये लेखा व आस्थापना विभागास लिपिक संवर्गातील कर्मचाऱ्यांची अत्यंत आवश्यकता असल्याने, सामान्य प्रशासन (माहिती व तंत्रज्ञान) विभाग, मंत्रालय, मुंबई येथील शासन निर्णय क्रमांक मातंसं/२०२२/प्र.क्र.४७/से-२/३९, दिनांक २७/०९/२०२२ अन्वये मनुष्यबळ उपलब्ध करुन घेणेकरिता प्रस्तावित करण्यात येत आहे. तसेच उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई येथील शासन निर्णय क्रमांक काआआ-२०१३/ प्र.क्र. २३३/कामगार-८, दिनांक ६/०९/२०२३ अन्वये बाह्य यंत्रणेकडून कामे करुन घेण्यासाठी सेवा पुरवठादार नियुक्त करण्यात आले आहेत, परंतू सदरील शासन निर्णयानुसार प्रक्रिया करण्यास बराच कालावधी लागण्याची शक्यता आहे. सदर शासन निर्णयामधील संदर्भात सामान्य प्रशासन विभाग (माहिती व तंत्रज्ञान) यांचे दिनांक २७/०९/२०२२ च्या शासन निर्णयाचा उल्लेख नाही. त्यामुळे तो अधिक्रमित झाला नसल्याचे निदर्शनास येते.

तसेच यापूर्वी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांचे मार्फत महाराष्ट्र इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी कॉर्पोरेशन लि., मुंबई यांना जावक क्रमांक रासाप्रपक/आस्था-तांत्रिक मनुष्यबळ/१२४/२०१/२०२०, दिनांक १७/०२/२०२० अन्वये दोन IT OFFICE ASSISTANT ०३ महिन्याकरिता सेवा उपलब्ध करुन देण्याबाबत पुरवठा आदेश देण्यात आले होते, तथापि या प्रक्रियेकरिता विहित पध्दतीनुसार (GST/TDS वजा करुन) रु. १,८५,०७६/- इतकी रक्कम दिनांक १८/०३/२०२० रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये अदा करण्यात आली आहे. परंतू सन २०२० मध्ये कोव्हिड-१९ च्या महामारीमुळे मनुष्यबळ प्राप्त झाले नाही. तसेच सदर रक्कम देखील प्राप्त झालेली नाही.

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांचे मार्फत महाराष्ट्र इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी कॉर्पोरेशन लि., मुंबई यांना संदर्भ क्र. ४ वरील दिनांक १८/०३/२०२० रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये मनुष्यबळ मागविण्यात आले होते. परंतू, सदर बाबतचे मनुष्यबळ या कार्यालयास अद्याप प्राप्त न झाल्याने अदा केलेली रक्कम रु. १,८५,०७६/- उपरोक्त मनुष्यबळाच्या अनुषंगाने देय रक्कमेतुन समायोजित करावी व उक्त तालिकेमध्ये नमूद केल्यानुसार एकुण ०५ पदांचे मनुष्यबळ करार पद्धतीवर तात्काळ प्राधिकरणास उपलब्ध करुन देण्याबाबत प्राधिकरणाच्या दिनांक २१/०९/२०२३ व १७/११/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

प्राधिकरणाच्या दिनांक १५/१२/२०२३ रोजीच्या पत्रास अनुसरुन महाराष्ट्र इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी कॉर्पोरेशन लि., मुंबई यांनी दिनांक १४/१२/२०२३ रोजीच्या ईमेलद्वारे एकुण १६ उमेदवारांची यादी प्राधिकरणास अवगत केली, सदरील प्रक्रियेद्वारे उमेदवारांची मुलाखतीद्वारे निवड करुन निव्वळ कंत्राटी तत्वावर नियुक्ती करण्याकरिता प्राधिकरणाच्या दिनांक १५/१२/२०२३ रोजीच्या कार्यालयीन आदेशानुसार मा. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यता आली.

तथापि या उमेदवारांची दिनांक १९/१२/२०२३ रोजी मुलाखत घेण्यात आली व एकुण १६ उमेदवारांपैकी ०४ उमेदवारांची निवड करण्यात आली, परंतू प्रत्यक्षात खालील ०३ उमेदवार या

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

कार्यालयास रुजू झाले व याबाबत प्राधिकरणाच्या दिनांक २९/१२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी कॉर्पोरेशन लि., मुंबई यांना कळविण्यात आले. उमेदवारांचा तपशील खालील प्रमाणे,-

| अ. क्र. | उमदेवाराचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १. | श्री. राकेश गोविंद पांगम | IT - Office Assistant |
| २. | श्री. पंकज संजय कांबळे | IT - Office Assistant |
| ३. | श्री. संजय तुळशीराम चव्हाण | IT - Office Assistant |

वरील ०३ उमेदवारांना प्रथम माहे जानेवारी ते मार्च या कालावधीकरिता निव्वळ कंत्राटी तत्वावर नियुक्ती देण्याबाबत दिनांक २९/१२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी कॉर्पोरेशन लि., मुंबई यांना कळविण्यात आले तसेच त्यांच्या कामाचा आढावा घेऊन पुढील नियुक्ती आदेश जारी करण्यात येईल असेही नमूद करण्यात आले होते.

तथापि कामाचा व्याप लक्षात घेता संबंधित कर्मचाऱ्यांच्या सेवा माहे एप्रिल मध्ये संपुष्टात आल्याने प्राधिकरणाच्या दिनांक ५/०४/२०२४ रोजीच्या पत्रान्वये माहे एप्रिल ते जुलै २०२४ या कालावधीकरिता मुदतवाढ देण्याबाबत महाराष्ट्र इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी कॉर्पोरेशन लि., मुंबई कळविण्यात आले आहे.

सबब मा. प्रवेश नियमाक प्राधिकरणाच्या दिनांक २८/०२/२०२३ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक २(ग) मध्ये दिलेल्या निर्देशानुसार वरील प्रमाणे महाराष्ट्र इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी कॉर्पोरेशन लि., मुंबई यांच्याद्वारे निव्व्ळ कंत्राटी तत्वावर नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीस प्राधिकरणाची कार्योत्तर मंजुरी मिळण्यास विनंती आहे.

या संदर्भात सांगोपांग चर्चा करुन सद्यस्थितीमध्ये कार्यरत असलेल्या ०३ कर्मचाऱ्यांच्या निव्वळ कंत्राटी तत्वावरील नियुक्तीच्या प्रस्तावास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. प्रस्तूत प्रकरणी संबंधित कर्मचाऱ्यांना कार्यालयातील कामाची निकड व कर्मचाऱ्यांचा कामाचा अहवाल पाहुन पुढील मुदत वाढ देण्याबाबत सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी उचित कार्यवाही करावी व प्राधिकरणास तसे अवगत करावे, असे निर्देश देण्यात आले.

<u>विषय क्रमांक ४:</u> <u>मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे.</u>

(क) <u>मा. अध्यक्ष, प्रनिप्रा यांच्या निर्देशानुसार संबंधित महाविद्यालय व विद्यार्थी यांनी प्राधिकरणाच्या दिनांक ३०/०४/२०२४ रोजीच्या बैठकीमध्ये संबंधित विद्यार्थ्यांच्या कागदपत्रांच्या मुळ नस्तीसह उपस्थित राहण्याचे निर्देश असलेल्या महाविद्यालयांची यादी.</u>

(१) <u>१४१२५५५९ : महात्मा गांधी मिशनचे विधी महाविद्यालय, नवी मुंबई - विधी ३ वर्ष / २०२०-२१.</u>

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये महात्मा गांधी मिशनचे, विधी महाविद्यालय, नवी मुंबई येथे विधी ३ वर्ष अभ्यासक्रमास प्रवेशित ६० विद्यार्थ्यांपैकी एकूण ५७ विद्यार्थ्यांना प्राधिकरणाच्या दिनांक ३०/०८/२०२१ रोजीच्या बैठकीमध्ये प्रवेश मान्यता देण्यात आली. उर्वरित ०३ विद्यार्थ्यांच्या

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

प्रवेशामध्ये संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांच्या अहवालानुसार ज्या प्रवेशांमध्ये त्रुटी दर्शविण्यात आल्याने प्राधिकरणाची प्रवेश मान्यता देण्यात आली नाही.

२. संबंधित महाविद्यालयाने दिनांक २२/०३/२०२२ रोजी पुनर्विलोकन अर्ज सादर केला, या संदर्भात दिनांक २७/०७/२०२२ रोजी सुनावणी घेण्यात आली. मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्या दिनांक २०/०९/२०२२ रोजीच्या आदेशान्वये संबंधित महाविद्यालयाने विहित कालावधीमध्ये पूर्ण व योग्य कागदपत्रे सादर न केल्याने पुनर्विलोकन याचिका रद्द करण्यात आली.

३. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३०/०९/२०२२ व १५/११/२०२२ रोजीच्या पत्रान्वये संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांना पुनश्च पडताळणीकरिता कळविण्यात आले. त्यानुसार महाविद्यालयाने सादर केलेल्या संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांच्या दिनांक ०९/०२/२०२३ रोजीच्या अहवालामध्ये नमूद असलेल्या एकुण ०२ पात्र प्रवेशांना प्राधिकरणाच्या दिनांक ३०/०६/२०२२ रोजीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

४. उर्वरित ०१ विद्यार्थ्यांबाबत संचालक, उच्चशिक्षण संचालनालय, पुणे यांच्या दिनांक ०९/०२/२०२३ रोजीच्या अहवालामध्ये प्रवेशांबाबत खालीलप्रमाणे नमूद केले आहे,-

| Sr No | Name Of The Candidate | Discrepancy | Director's Remark |
|---|---|---|---|
| 1 | Ramesh Uttamrao Deshmukh | EWS Not Submitted | EWS Certificate submitted after cutoff date of admission. |

५. वरील बाबी व प्रवेशित विद्यार्थीनीचे शैक्षणिक हित विचारात घेता विचारात घेता महात्मा गांधी मिशनचे, विधी महाविद्यालय, नवी मुंबई येथील विधी - ३ वर्ष अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रवेशित कु. रमेश उत्तमराव देशमुख प्रवेशास पात्र ठरत असल्याने सदरील प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तथापि, प्रस्तूत प्रकरणी महाविद्यालयाकडून झालेल्या गैरप्रकार/निष्काळजीपणाबाबत संबंधित महाविद्यालयास रुपये ०१ लाख दंड आकारण्याचा निर्णय प्राधिकरणाने घेतला आहे. सदरचा दंड "सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई" यांच्या नावाने धनाकर्षाच्या स्वरुपात किंवा "६०२४९४८१३२१" (IFSC Code : MAHB०००0३१०) या बँक ऑफ महाराष्ट्राच्या बचत खात्यामध्ये NEFT/RTGS द्वारे भरणा करण्यात यावा. तसेच सदरील दंडाची रक्कम संबंधित विद्यार्थी/पालक यांच्याकडून वसूल करण्यात येणार नसल्याचे शपथपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

(२) <u>१७०२ : विवा इन्स्टिटयुट ऑफ अप्लाईड आर्ट, विरार - पदवी कला / २०२०-२१.</u>

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील व्यावसायिक पदवी कला अभ्यासक्रमास प्रवेशित कु. यादव धृवेश बाबूराव यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी प्राधिकरणाच्या दिनांक २८/०२/२०२४ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक ७(ङ) मधील प्रपत्र - ब (अ.क्र. २०) अन्वये रु. १ लाख दंड आकारणी करुन प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

विवा इन्स्टिटयूट ऑफ अप्लाईड आर्ट, पालघर यांनी दिनांक २०/०३/२०२४ रोजीच्या पत्रान्वये सदरील दंड क्षमापित करण्याकरिता केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने पूर्व पृष्ठावरील टिपणीस अनुसरुन प्राधिकरणाच्या दिनांक १०/०४/२०२४ रोजीच्या पत्रान्वये या संदर्भात कला संचालनालय, मुंबई यांना प्राधिकरणाद्वारे केलेल्या दंडात्मक कारवाईबाबत अभिप्राय सादर करण्यास कळविण्यात आले होते.

या अनुषंगाने कला संचालनालय, मुंबई यांनी दिनांक ३०/०५/२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रस्तूत प्रकरणी खालील प्रमाणे अभिप्राय सादर केले आहेत,-

> "…..प्राचार्य, विवा इन्स्टिटयूट ऑफ अप्लाईड आर्ट, पालघर यांनी महाविद्यालयास झालेला दंड क्षमापित करण्याबाबत दिनांक २०/०३/२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्राधिकरणास विनंती केलेली आहे. सदर बाब विचारात घेता कु. यादव धृवेश बाबूराव यांच्या प्रवेश प्रकरणी कागदपत्रांची पूर्तता झालेली असल्याने संबंधित महाविद्यालयास या संदर्भात करण्यात आलेला दंड क्षमापित करण्याबाबत या संचालनालयाची कोणतीही हरकत नाही. या प्रकरणी योग्य ती पुढील कार्यवाही आपल्या स्तरावरुन करण्यात यावी, ही विनंती."

प्रस्तूत प्रकरणी शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील व्यावसायिक पदवी कला अभ्यासक्रमास प्रवेशित कु. यादव धृवेश बाबूराव यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी प्राधिकरणाच्या दिनांक २८/०२/२०२४ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक ७(ङ) अन्वये आकारण्यात आलेला रु. १ लाख दंड क्षमापित करण्याबाबतची विनंती नाकारण्यात येत आहे. संबंधित महाविद्यालयाने प्राधिकरणाच्या दिनांक २८/०२/२०२४ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक ७(ङ) निर्णयाची त्वरीत अंबलबजावणी करावी.

(३) <u>१५०२ : डॉ. डी वाय पाटील कॉलेज ऑफ अप्लाईड आर्ट ॲण्ड क्राफ्ट, पुणे - पदवी कला / २०२०-२१.</u>

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील व्यावसायिक पदवी कला अभ्यासक्रमास प्रवेशित कु. जगताप सायली अशोक, कु. खडसे हर्षदा भारत व कु. चक्के श्रेया नंदकुमार यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी प्राधिकरणाच्या दिनांक २८/०२/२०२४ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक ७(ङ) मधील प्रपत्र - ब (अ.क्र. १९) अन्वये रु. १ लाख दंड आकारणी करुन प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

डॉ. डी.वाय. पाटील कॉलेज ऑफ अप्लाईड आर्ट ॲण्ड क्राफ्टस, पुणे यांनी दिनांक २७/०३/२०२४ रोजीच्या पत्रान्वये सदरील दंड क्षमापित करण्याकरिता केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने पूर्व पृष्ठावरील टिपणीस अनुसरुन प्राधिकरणाच्या दिनांक १२/०४/२०२४ रोजीच्या पत्रान्वये या संदर्भात कला संचालनालय, मुंबई यांना प्राधिकरणाद्वारे केलेल्या दंडात्मक कारवाईबाबत अभिप्राय सादर करण्यास कळविण्यात आले होते.

या अनुषंगाने कला संचालनालय, मुंबई यांनी दिनांक ३०/०५/२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रस्तूत प्रकरणी खालील प्रमाणे अभिप्राय सादर केले आहेत,-

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

"…..प्राचार्य, डॉ. डी.वाय. पाटील कॉलेज ऑफ अप्लाईड आर्ट ॲण्ड क्राफ्टस, पुणे यांनी महाविद्यालयास झालेला दंड क्षमापित करण्याबाबत दिनांक २७/०३/२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्राधिकरणास विनंती केलेली आहे. सदर बाब विचारात घेता कु. जगताप सायली अशोक, कु. खडसे हर्षदा भारत व कु. चक्के श्रेया नंदकुमार यांच्या प्रवेश प्रकरणी कागदपत्रांची पूर्तता झालेली असल्याने संबंधित महाविद्यालयास या संदर्भात करण्यात आलेला दंड क्षमापित करण्याबाबत या संचालनालयाची कोणतीही हरकत नाही. या प्रकरणी योग्य ती पुढील कार्यवाही आपल्या स्तरावरुन करण्यात यावी, ही विनंती."

प्रस्तूत प्रकरणी शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील व्यावसायिक पदवी कला अभ्यासक्रमास प्रवेशित कु. जगताप सायली अशोक, कु. खडसे हर्षदा भारत व कु. चक्के श्रेया नंदकुमार यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी प्राधिकरणाच्या दिनांक २८/०२/२०२४ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक ७(ङ) अन्वये आकारण्यात आलेला रु. १ लाख दंड क्षमापित करण्याबाबतची विनंती नाकारण्यात येत आहे. संबंधित महाविद्यालयाने प्राधिकरणाच्या दिनांक २८/०२/२०२४ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक ७(ङ) निर्णयाची त्वरीत अंबलबजावणी करावी.

(ख) **मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३०/११/२०२३ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्र. ७(घ) मधील निर्देशानुसार संबंधित संचालकांनी सादर केलेल्या फेर पडताळणी अहवालानुसार प्रवेश मान्यतेबाबत अभ्यासक्रमनिहाय प्रकरणे निर्णयाकरिता सादर .**

(१) **१५१७२२४२ : श्री.शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शीचे राजर्षी शाहु विधी महाविद्यालय, बार्शी – विधी ३ वर्ष / २०२०-२१.**

सदर सुनावणी प्रकरणी महाविद्यालयाच्या वतीने ॲड अभिजीत अनिल पाटील, सहाय्यक प्राध्यापक व सागर माणिक पाटील विद्यार्थी सुनावणीस उपस्थित होते.

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये श्री.शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शीचे राजर्षी शाहु विधी महाविद्यालय, बार्शी येथे विधी ३ वर्ष अभ्यासक्रमास प्रवेशित ६६ विद्यार्थ्यापैकी एकूण ६५ विद्यार्थ्यांना प्राधिकरणाच्या दिनांक ३०/०८/२०२२ रोजीच्या बैठकीमध्ये प्रवेश मान्यता देण्यात आली. उर्वरित कु. पाटील सागर माणिक विद्यार्थ्याच्या प्रवेशामध्ये संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांच्या अहवालानुसार ज्या प्रवेशांमध्ये त्रुटी दर्शविण्यात आल्याने प्राधिकरणाची प्रवेश मान्यता देण्यात आली नाही.

२. संबंधित महाविद्यालयाने दिनांक १३/१०/२०२१ रोजी पुनर्विलोकन अर्ज सादर केला, या संदर्भात दिनांक २५/०२/२०२२ रोजी सुनावणी घेण्यात आली. मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्या दिनांक २३/०६/२०२२ रोजीच्या आदेशान्वये संबंधित महाविद्यालयाने विहित कालावधीमध्ये पूर्ण व योग्य कागदपत्रे सादर न केल्याने पुनर्विलोकन याचिका रद्द करण्यात आली.

३. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३०/०९/२०२२ व १५/११/२०२२ रोजीच्या पत्रान्वये संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांना पुनश्च पडताळणीकरिता कळविण्यात आले. सदर

(न्या. वी. डोंगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

महाविद्यालयाचा अहवाल प्राधिकरण कार्यालयात प्राप्त न झाल्यामुळे प्रवेश नियामक प्राधिकरणाची बैठक दिनांक ३१/०८/२०२३ रोजीच्या विषय क्रमांक ४(ड) मधील निर्णयान्वये सदर महाविद्यालयातील प्रवेशांना प्राधिकरणाची मान्यता नाकारण्यात आली.

तद्‌नंतर संबंधित महाविद्यालयाने प्राधिकरणाकडे दिनांक १५/०४/२०२४ रोजी मान्यतेसाठी सादर केला. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांच्या दिनांक २७/०३/२०२४ रोजीच्या अहवालामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे,-

"श्री.पाटील माणिक सागर यांच्या प्रवेशाबाबत EWS seats are over n above seats, hence only EWS category candidates are eligible for the allocation on seats reserved for EWS category. Hence not certified याप्रमाणे त्रुटी दर्शविण्यात आलेली आहे. सदरहू विद्यार्थ्यांने प्रवेशासाठी खुल्या प्रवर्गातुन कॅप साठीचा अर्ज भरलेला होता. तथापि, महाविद्यालयाने संस्थास्तरीय प्रवेश फेरीमध्ये इ डब्लु एस या राखीव प्रवर्गासाठी अधिसंख्य असलेल्या जागेवर प्रवेश दिलेला आहे. वस्तुत: अधिसंख्या जागा या त्याच प्रवर्गासाठी असल्याने इतर प्रवर्गातील उमेद्वारांना सदरहु जागेवर प्रवेश देता येत नाही. तथापि, महाविद्यालयाने नियमबाहय पध्दतीने अधिसंख्या असलेल्या जागेवर सदरहू विद्यार्थ्याला प्रवेश दिलेला आहे. सदरहू प्रवेशाच्या स्पष्टीकरणार्थ महाविद्यालयाने संबंधित विद्यार्थ्याकडे प्रवेशाचे वेळी इ.डब्लु.एस. प्रमाणपत्र उपलब्ध असल्याचे नमूद केलेले आहे".

संचालक, उच्च शिक्षण यांच्या दिनांक २७/०३/२०२४ रोजीच्या तपासणी अहवालानुसार EWS या अधिसंख्य जागेवर श्री.शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शीचे राजर्षी शाहु विधी महाविद्यालय, बार्शी या महाविद्यालयाने संस्था स्तरावर विधी - ३ वर्ष अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रवेशित कु. पाटील सागर माणिक यांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता नाकारण्यात येत आहे.

(२) <u>२६८११०५३ : आबासाहेब काकडे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, अहमदनगर - बी.एड / २०२०-२१</u>

सदर सुनावणी प्रकरणी महाविद्यालयाच्या वतीने श्री.दारकुंडे अविनाश देवराव, कनिष्ठ लिपीक सुनावणीस उपस्थित होते.

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये आबासाहेब काकडे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, अहमदनगर येथे बी.एड अभ्यासक्रमास प्रवेशित १०६ विद्यार्थ्यांपैकी एकूण ७१ विद्यार्थ्यांना प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०८/२०२१ रोजीच्या बैठकीमध्ये प्रवेश मान्यता देण्यात आली. एकुण ३५ विद्यार्थ्यांच्या प्रवेशामध्ये संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांच्या अहवालानुसार ज्या प्रवेशांमध्ये त्रुटी दर्शविण्यात आल्याने प्राधिकरणाची प्रवेश मान्यता देण्यात आली नाही.

२. संबंधित महाविद्यालयाने दिनांक २९/०१/२०२२ रोजी पुनर्विलोकन अर्ज सादर केला, या संदर्भात दिनांक ०९/०४/२०२२ रोजी सुनावणी घेण्यात आली. मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्या दिनांक २४/०६/२०२२ रोजीच्या आदेशान्वये संबंधित महाविद्यालयाने विहित कालावधीमध्ये पूर्ण व योग्य कागदपत्रे सादर न केल्याने पुनर्विलोकन याचिका रद्द करण्यात आली.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

३. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३०/०९/२०२२ व १५/११/२०२२ रोजीच्या पत्रान्वये संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांना पुनश्च पडताळणीकरिता कळविण्यात आले. सदर महाविद्यालयाचा अहवाल प्राधिकरण कार्यालयात प्राप्त न झाल्यामुळे प्रवेश नियामक प्राधिकरणाची बैठक दिनांक ३१/०८/२०२३ रोजीच्या विषय क्रमांक ४(ड) मधील निर्णयान्वये सदर महाविद्यालयातील प्रवेशांना प्राधिकरणाची मान्यता नाकारण्यात आली.

तद्नंतर संबंधित महाविद्यालयाने प्राधिकरणाकडे दिनांक ०६/०३/२०२४ रोजी मान्यतेसाठी सादर केला. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांच्या दिनांक १६/०२/२०२४ रोजीच्या अहवालामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे,-

| Sr No | Name Of The Candidate | Discrepancy | Director's Remark |
|---|---|---|---|
| 1 | Ahire Pooja Anil | Caste, Validity Pending | Certified |
| 2 | Aishwarya Rajendra Mandan | Caste, Validity,Ncl Pending | Certified |
| 3 | Akash Sambhaji Wagh | Caste, Validity,Ncl Pending | Certified |
| 4 | Akshata Shamsundar Raktate | Caste, Validity,Ncl Pending | Certified |
| 5 | Akshay Dattatray Pawar | Caste, Validity,Ncl Pending | Certified |
| 6 | Akshay Sambhaji Kale | Caste, Validity,Ncl Pending | Certified |
| 7 | Anil Bapusaheb Gadage | Domisile | Certified |
| 8 | Ayodhya Murlidhar Garad | Ews Updeted | Certified |
| 9 | Ayub Murad Shaikh | Ews Updeted | Certified |
| 10 | Dipali Devidas Patekar | Caste, Validity,Ncl Pending | Certified |
| 11 | Dipti Dilip Supare | Caste, Validity,Ncl Pending | Certified |
| 12 | Gajanan Anilkumar Darandale | Ews Pending | Certified |
| 13 | Gautam Kadu Pawar | Not Visible | Certified |
| 14 | Janabai Kachru Nital | Ews Pending | Certified |
| 15 | Jayshri Sanjay Datir | Not Visible | Certified |
| 16 | Kushaba Ramdas Avhad | Caste, Validity,Ncl Pending | Certified |
| 17 | Lahu Jabaji Chitale | Ews Pending | Certified |
| 18 | Pramod Bandu Babar | Ews Pending | Certified |
| 19 | Pranita Kacharu Karkhele | Caste, Validity, Ncl Pending | Certified |
| 20 | Pranjal Bhausaheb Katkar | Ews Pending | Certified |
| 21 | Puja Shivajirao Deshmukh | Ews Pending | Certified |
| 22 | Rahul Laxman Jarhad | Ews Pending | Certified |
| 23 | Ramesh Bhaurao Narwade | Ews Pending | Certified |
| 24 | Rameshwari Anant Shelke | Caste, Validity, Ncl Pending | Certified |

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

| Sr No | Name Of The Candidate | Discrepancy | Director's Remark |
|---|---|---|---|
| 25 | Renuka Jayram Kesbhat | Ews Pending | Certified |
| 26 | Reshma Bhaskar Jagtap | Caste, Validity, Ncl Pending | Certified |
| 27 | Rupali Bhausaheb Payghan | Ews Pending | Certified |
| 28 | Sanjay Dattatray Kedar | Caste, Validity, Ncl Pending | Certified |
| 29 | Santosh Mohan Ghule | Caste, Validity, Ncl Pending | Certified |
| 30 | Sapana Baban Pawar | Caste, Validity, Ncl Pending | Certified |
| 31 | Seema Kalyan Zanje | Ews Pending | Certified |
| 32 | Smita Sarjerao Phatangare | Caste, Validity, Ncl Pending | Certified |
| 33 | Tanuja Machindra Lawande | Caste, Validity, Ncl Pending | Certified |
| 34 | Uddhav Vinayak Kakade | Ews Pending | Certified |
| 35 | Vaishali Ganesh Jadhav | Ews Pending | Certified |

४. वरील बाबी व प्रवेशित विद्यार्थीनीचे शैक्षणिक हित विचारात घेता विचारात घेता आबासाहेब काकडे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, अहमदनगर येथील बी.एड. अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रवेशित उक्त तालिकेतील नमूद ३५ विद्यार्थी प्रवेशास पात्र ठरत असल्याने सदरील प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तथापि, प्रस्तूत प्रकरणी महाविद्यालयाकडून झालेल्या गैरप्रकार/निष्काळजीपणाबाबत संबंधित महाविद्यालयास रुपये ०२ लाख दंड आकारण्याचा निर्णय प्राधिकरणाने घेतला आहे. सदरचा दंड "सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई" यांच्या नावाने धनाकर्षाच्या स्वरुपात किंवा "६०२४९४८१३२१" (IFSC CODE : MAHB०००००३१०) या बँक ऑफ महाराष्ट्राच्या बचत खात्यामध्ये NEFT/RTGS द्वारे भरणा करण्यात यावा. तसेच सदरील दंडाची रक्कम संबंधित विद्यार्थी/पालक यांच्याकडून वसूल करण्यात येणार नसल्याचे शपथपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

(३) <u>२६८११०५४ : छत्रपती शिवाजी महाराज शिक्षणशास्त्र महाविद्यालय, जामखेड - बी.एड / २०२०-२१</u>

सदर सुनावणी प्रकरणी महाविद्यालयाच्या वतीने श्री.शेख झेड ए, लिपीक सुनावणीस उपस्थित होते.

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये छत्रपती शिवाजी महाराज शिक्षणशास्त्र महाविद्यालय, जामखेड येथे बी.एड अभ्यासक्रमास प्रवेशित ५५ विद्यार्थ्यांपैकी एकूण ४० विद्यार्थ्यांना प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०८/२०२१ रोजीच्या बैठकीमध्ये प्रवेश मान्यता देण्यात आली. एकुण १५ विद्यार्थ्यांच्या प्रवेशामध्ये संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांच्या अहवालानुसार ज्या प्रवेशांमध्ये त्रुटी दर्शविण्यात आल्याने प्राधिकरणाची प्रवेश मान्यता देण्यात आली नाही.

२. संबंधित महाविद्यालयाने दिनांक ३१/१२/२०२१ रोजी विद्यार्थ्यांबाबत पुनर्विलोकन अर्ज सादर केला, या संदर्भात दिनांक ०९/०४/२०२२ रोजी सुनावणी घेण्यात आली. मा. अध्यक्ष, प्रवेश

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

नियामक प्राधिकरण यांच्या दिनांक २४/०६/२०२२ रोजीच्या आदेशान्वये संबंधित महाविद्यालयाने विहित कालावधीमध्ये पूर्ण व योग्य कागदपत्रे सादर न केल्याने पुनर्विलोकन याचिका रद्द करण्यात आली.

३. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३०/०९/२०२२ व १५/११/२०२२ रोजीच्या पत्रान्वये संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांना पुनश्च पडताळणीकरिता कळविण्यात आले. सदर महाविद्यालयाचा अहवाल प्राधिकरण कार्यालयात प्राप्त न झाल्यामुळे प्रवेश नियामक प्राधिकरणाची बैठक दिनांक ३१/०८/२०२३ रोजीच्या विषय क्रमांक ४(ड) मधील निर्णयान्वये सदर महाविद्यालयातील प्रवेशांना प्राधिकरणाची मान्यता नाकारण्यात आली.

तद्नंतर संबंधित महाविद्यालयाने प्राधिकरणाकडे दिनांक १३/०/२०२४ रोजी मान्यतेसाठी सादर केला. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांच्या दिनांक ०१/०२/२०२४ रोजीच्या अहवालामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे,-

| Sr. No. | Name Of The Candidate | Discrepancy | Director's Remark |
|---|---|---|---|
| 1 | Ajit Uttam Nimase | Ews | Certified |
| 2 | Apurva Pravin Ijate | Caste,Validity,Ncl | Certified |
| 3 | Dipali Sunil Murkute | Ews Updet | Certified |
| 4 | Gauri Baban Farande | Graduation Marklist Updet, Caste, Validity, Ncl | Certified |
| 5 | Kiran Prashant Nale | Caste,Validity,Ncl | Certified |
| 6 | Mahadev Jyotirling Pawar | Ews Pending | Certified |
| 7 | Mohan Sukhadev Jare | Ews Pending | Certified |
| 8 | Pratiksha Dadasaheb Ghule | Ews Pending | Certified |
| 9 | Savita Sampat Kharpude | Caste,Validity,Ncl | Certified |
| 10 | Sonali Annasaheb Sarade | Ews Pending | Certified |
| 11 | Vanita Ajinath Pol | Not Visible | Certified |
| 12 | Vidya Gulab Gaikwad | Not Visible | Certified |
| 13 | Vidya Rohidas Netke | Caste,Validity,Ncl | Certified |
| 14 | Vinod Mahadev Ugale | Ews Pending | Certified |
| 15 | Vishal Anil Jare | Ews Pending | Certified |

४. वरील बाबी व प्रवेशित विद्यार्थीनीचे शैक्षणिक हित विचारात घेता विचारात घेता छत्रपती शिवाजी महाराज शिक्षणशास्त्र महाविद्यालय, जामखेड येथील बी.एड. अभ्यासक्रमास

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रवेशित उक्त तालिकेतील नमूद १५ विद्यार्थी प्रवेशास पात्र ठरत असल्याने सदरील प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तथापि, प्रस्तूत प्रकरणी महाविद्यालयाकडून झालेल्या गैरप्रकार/निष्काळजीपणाबाबत संबंधित महाविद्यालयास रुपये ०१ लाख दंड आकारण्याचा निर्णय प्राधिकरणाने घेतला आहे. सदरचा दंड "सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई" यांच्या नावाने धनाकर्षाच्या स्वरुपात किंवा "६०२४९४८१३२१" (IFSC Code : MAHB0000३१०) या बँक ऑफ महाराष्ट्राच्या बचत खात्यामध्ये NEFT/RTGS द्वारे भरणा करण्यात यावा. तसेच सदरील दंडाची रक्कम संबंधित विद्यार्थी/पालक यांच्याकडून वसूल करण्यात येणार नसल्याचे शपथपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

(ग) **<u>शैक्षणिक वर्ष २०२१-२२ व २०२२-२३ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी प्राप्त झालेल्या प्रवेश मान्यता प्रस्तावांवर निर्णय घेणे.</u>**

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ व २०२२-२३ मधील प्रवेशित उच्च व तंत्र शिक्षण अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रकरणी संबंधित संचालनालयाने सादर केलेल्या अहवालास अनुसरुन खाली नमूद महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास संबंधित संचालकांच्या तपासणी अहवालानुसार प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तथापि, प्रस्तूत प्रकरणी महाविद्यालयाकडून प्रवेश मान्यता प्रस्ताव उशिरा सादर करण्याच्या निष्काळजीपणाबाबत महाविद्यालयांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे दंड आकारण्याचा निर्णय घेतला आहे.

| Sr. No | Institute Code | Course | A.Y | Name of the Institute | No of Admissions Approved | No of Admissions Not Approved | Admission Cancelled | Penalty |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 24821023 | LLB 3 Year | 2021-22 | Balasaheb Thackeray Law College, Panvel | 118 | 3 | 0 | 2 Lakh |
| 2 | 2007 | MCA | 2022-23 | Swami Ramanand Tirth Marathwada University, Nanded | 67 | 0 | 0 | 1 Lakh |

सदरचा दंड "सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई" यांच्या नावाने धनाकर्षाच्या स्वरुपात किंवा "६०२४९४८१३२१" (IFSC CODE : MAHB0000३१०) या बँक ऑफ महाराष्ट्राच्या बचत खात्यामध्ये NEFT/RTGS द्वारे भरणा करण्यात यावा. तसेच सदरील दंडाची रक्कम संबंधित विद्यार्थी/पालक यांच्याकडून वसूल करण्यात येणार नसल्याचे शपथपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

(घ) **<u>शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत घेण्यात येणाऱ्या सामाईक प्रवेश परीक्षा व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया नेमणूक करण्यात आलेल्या सेवापुरवठादार मे. इडूस्पार्क इंटरनॅशनल प्रा.लि., मुंबई यांचे दर निश्चित करण्याबाबत.</u>**

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत घेण्यात येणाऱ्या सामाईक प्रवेश परीक्षा व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेकरिता नेमणूक करण्यात आलेल्या सेवापुरवठादार मे. इडूस्पार्क इंटरनॅशनल प्रा.लि., मुंबई यांचे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठीचे दर निश्चित करण्याबाबत आयुक्त व सक्षम

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांनी सादर केलेल्या दिनांक ३१/०७/२०२४ रोजीच्या प्रस्तावावर सखोल चर्चा करण्यात आली.

अधिनियम २०१५ च्या कलम १० (६) मधील तरतुदींनुसार आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष यांनी शैक्षणिक वर्ष् २०२३-२४ साठी सामाईक प्रवेश परिक्षा घेणे व केंद्रिभुत प्रवेश प्रक्रिया राबविणे या कामासाठी मे. इडूस्पार्क इंटरनॅशनल प्रा.लि., मुंबई या सेवापुरवठादाराची नेमणुक करण्यात आलेली आहे. या संदर्भात सादर केलेल्या RFP नुसार निश्चित करण्यात आलेल्या दरास प्राधिकरणाच्या दिनांक २८/०२/२०२३ रोजीच्या बैठकित मान्यता देण्यात आलेली आहे.

उक्त कामाबाबत सेवापुरवठादारासोबत दिनांक १३/०३/२०२४ रोजी सामंजस्य करार करण्यात आला. या करारामधील मुद्दा क्र.१० मधील १०.१.१० "Every year there will be a price escalation of १०% on the price of the subsequent year of the agency subject to the satisfactory work." नुसार शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी सेवापुरवठादाराच्या दरामध्ये १०% वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी यांनी सादर केला.

सन्माननीय सदस्य डॉ.एन.एस.उमराणी यांनी सामाईक प्रवेश परिक्षे दरम्यान पुणे येथील परिक्षा केंद्रावर नेमण्यात आलेल्या कर्मचारी/अधिकारी यांच्याकडे अधिकृत ओळखपत्र नसल्याचे प्राधिकरणाच्या निदर्शनास आणुन दिले.

तथापि या संदर्भात ऑनलाईन परिक्षा सुरळीत व पारदर्शक पध्दतीने राबविण्याच्या दृष्टिने प्राधिकरणाच्या मान. सदस्यांनी खालील प्रमाणे निर्देश दिले आहेत,-

१) सामाईक प्रवेश परिक्षेसाठी वापरण्यात येणाऱ्या संगणक प्रणालीचे SECURITY AUDIT करुन घेणे बंधनकारक राहील.
२) प्रत्येक परिक्षा केंद्रावर अधिकृत कर्मचारी/अधिकारी नियुक्त करणे बंधनकारक राहील.

विषयांकित प्रकरणी आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष यांनी महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम १०(६) प्रमाणे योग्य ती कार्यवाही करावी.

(ड) प्राधिकरण बैठकित खालील मुद्यावर चर्चा करुन निर्देश देण्यात आले,

१. Learning And Testing Centre (LTC) संदर्भात आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी व संबंधित संचालक यांच्यासोबत करण्यात येणारा सामंजस्य कराराचा मसुदा अंतिम करुन प्राधिकरणासमोर मान्यतेसाठी सादर करण्यात यावा.

२. Learning And Testing Centre (LTC) ची आवश्यकता लक्षात घेता, तसेच राज्य सामाईक प्रवेश परिक्षा केंद्राबाबत स्वयंपूर्ण घेण्याच्या दृष्टीने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी Learning And Testing Centre (LTC) केंद्र प्रस्तावित असल्याचे आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष यांनी नमुद केले.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

३. प्राधिकरणाचे सदस्य तथा संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांनी ज्या प्रवेश प्रकरणी प्राधिकरण स्तरावर दंडात्मक व इतर कार्यवाहीबाबत निर्णय घेण्यात आलेले आहेत, अशा प्रवेश प्रकरणी अभिप्रायासाठी सदरील प्रकरणे संबंधित संचालनालयास पुनश्च पाठविण्याची आवश्यकता नाही. तथापि अशा निवेदन पुर्नविचारांबाबत प्रचलित पध्दतीप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी विषयाची तातडी लक्षात घेता, बैठकीचे इतिवृत्त मंजूरीची वाट न पाहता बैठकीमध्ये झालेल्या ठरावानुसार यापुढे कार्यवाही त्वरीत करण्यांबाबत निर्देश देण्यात आले. तसेच बैठकीचे इतिवृत्त निर्गमित झाल्यानंतर प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील सर्व संबंधीत विभागानी त्यांच्याशी संबंधीत प्रकरणी आवश्यक ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्यामार्फत प्राधिकरणास त्वरीत सादर करावा. या संदर्भात अवर सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण व प्रशासकीय अधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई हे दोन्ही विभागातील संबंधीत विभागांना बैठकीचे इतिवृत्त उपलब्ध करुन देतील, याबाबत कृपया नोंद घ्यावी.

वरीलप्रमाणे विषयनिहाय सांगोपांग चर्चा झाली, बैठकीच्या सरतेशेवटी सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई यांनी उपस्थितांचे आभार मानून सदर बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

(जे.पी. डांगे) भा.प्र.से.
अध्यक्ष,
प्रवेश नियामक प्राधिकरण तथा
माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.

दिनांक : 16/10/24